Sakal, Pune February 11, 2014 Pp. 10

# विश्वातील सर्वांत जुना तारा सापडला



विश्व : कल्पनाचित्र

**मेलबर्न, ता. १० (वृत्तसंस्था)** : ऑस्ट्रेलियातील खगोलशास्त्रज्ञांना विश्वातील माहीत असलेला सर्वांत जुना तारा सापडला आहे. या शोधामुळे आपल्या विश्वाच्या निर्मितीबाबतच्या संकल्पना बदलू शकतात, असे या शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

हा तारा 'बिग बँग' म्हणजेच महास्फोटानंतर काही दशलक्ष वर्षांनीच जन्माला आल्याचे सिद्ध होत असल्याचे ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटीमधील शास्त्रज्ञांच्या गटाने सांगितले आहे. हा महास्फोट १३.८ अब्ज वर्षांपूर्वी झाल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. हा तारा आपल्या आकाशगंगेत असल्याचे डॉ. स्टीफन केलर या खगोलशास्त्रज्ञाने सांगितले. या ताऱ्याच्या अभ्यासामुळे विश्वातील पृथ्वीच्या स्थानाबद्दल आणि जगण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांची उत्पत्ती कशी आणि कोठून झाली, हे कळू शकेल, असे केलर म्हणाले.

या नव्या ताऱ्याचे स्वरूप पाहता तो विश्वाच्या सुरवातीला तयार झालेल्या ताऱ्यांपैकी एक असल्याचे समजते. याचे वस्तुमान आपल्या सूर्यापेक्षा ६० पटींनी अधिक आहे, असे केलर यांनी सांगितले. सुरवातीच्या काळातील सर्व तारे मोठा स्फोट होऊन नष्ट झाल्याचा आधी समज होता.

या स्फोटामुळे अवकाशात मोठ्या प्रमाणावर लोहाचे प्रचंड प्रमाण असलेली धूळ पसरल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज होता; पण या नव्या ताऱ्याच्या वातावरणात कार्बन आणि मॅग्नेशियमचे प्रमाण सापडले असून, लोहाचे अस्तित्व मिळाले नाही. या शोधाबद्दलची माहिती 'नेचर' या नियतकालिकात प्रसिद्ध झाली आहे.

### सापडलेल्या ताऱ्याविषयी

- पृथ्वीपासूनचे अंतर .......... ६००० प्रकाश वर्षे
- ताऱ्याचे वय अंदाजे ............ १३.६ अब्ज वर्षे
- महास्फोटाचा काळ ........ १३.८ अब्ज वर्षांपूर्वी